# ‘आयपीओं’चा उत्सव

## बीएसई व एनएसईच्या मुख्य व एसएमई मंचांवर कंपन्या करणार भांडवल उभारणी

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

प्रारंभिक भागविक्रीद्वारे (आयपीओ) भांडवल बाजारात उतरून भांडवलाची उभारणी करणे आता नवीन राहिलेले नाही. साधारणपणे कॅलेंडर वर्ष संपताना दरवर्षी आयपीओंची रेलचेल असते. चालू वर्षदेखील याला अपवाद नाही. यावर्षी चालू महिन्यात प्रत्येक आठवड्यात मोठ्या संख्येने कंपन्या आयपीओ आणत आहेत. सोमवारपासून सुरू झालेल्या आठवड्यात मुंबई आणि राष्ट्रीय शेअर बाजाराच्या मुख्य मंचावर आठ आणि एसएमई मंचावर आठ अशा एकूण १६ कंपन्या समभागविक्री करत आहेत.

दोन्ही शेअर बाजारांत उतरू पाहणाऱ्या कंपन्या या सप्ताहात सुमारे ४,५०० कोटी रुपयांची भांडवल उभारणी करतील. त्याचवेळी या शेअर बाजारांच्या एसएमई मंचावर येऊ पाहणाऱ्या कंपन्या सुमारे १०० कोटी रुपयांची उभारणी करणार आहेत.

**मोतिसन्स ज्वेलर्सचा १४.८८ पट भरणा**

जयपूरस्थित मोतिसन्स ज्वेलर्सचा आयपीओ सोमवारी गुंतवणुकीसाठी खुला झाला. पहिल्या दिवशीच याआयपीओसाठी १४.८८ पट भरणा झाला. या आयपीओतून एकूण १५१ कोटी रुपयांच्या भांडवलाची उभारणी केली जाणार आहे. एनएसईने दिलेल्या माहितीनुसार कंपनीने २,०८,७१,००० समभाग विक्रीसाठी आणले आहेत. त्यासाठी ३१,०५,३८,००० समभागांची मागणी आली आहे. रिटेल वैयक्तिक गुंतवणूकदारांनी २२.०१ पट मागणी नोंदवली आहे. बिगरसंस्थात्मक गुंतवणूकदारांनी १३.७४ पट भरणा केला. या आयपीओ अंतर्गत २,७४,७१,००० समभाग विक्रीसा काढले जाणार आहेत. यासाठी प्रतिसमभाग ५२ ते ५५ रुपये दरपट्टा ठरवण्यात आला आहे. या आयपीओमध्ये सर्व समभाग नवे आहेत. २५० समभागांचा एक लॉट असून समभागविक्री २० डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.

**सूरज इस्टेटसाठी ७१ टक्के भरणा**

सूरज इस्टेट डेव्हलपर्स या कंपनीने ४०० कोटी रुपये भांडवलाची उभारणी करण्यासाठी आयपीओ बाजारात आणला. सोमवारी पहिल्या दिवशी ७१ टक्के भरणा झाला आहे. या आयपीओमध्ये ८२,३५,२९३ समभाग विक्रीला काढले गेले आहेत. यापैकी सोमवारी ५८,५०,९४६ समभागांसाठी मागणी नोंदवली गेली. या आयपीओमध्ये सर्व नवे समभाग विक्रीला आणले गेले आहेत. यासाठी प्रतिसमभाग ३४० ते ३६० रुपये दरपट्टा आहे. आयपीओपूर्वी गेल्या शुक्रवारी कंपनीने अँकर गुंतवणूकदारांकडून १२० कोटी रुपयांची उभारणी केली. सूरज इस्टेट डेव्हलपर्सचा आयपीओ २० डिसेंबरपर्यंत सुरू राहणार आहे.




### मूथुट मायक्रोफिनसाठी ८२ टक्के भरणा

मूथुट पापाचान समूहातील सूक्ष्मवित्त क्षेत्रातील ही कंपनी आयपीओद्वारे ९६० कोटी रुपयांची उभारणी करणार आहे. सोमवारी पहिल्या दिवशी मूथुट मायक्रोफिनच्या समभागांसाठी ८२ टक्के भरणा झाला. पहिल्या दिवशी कंपनीने २,४३,८७,४४७ समभाग विक्रीला काढले होते. प्रत्यक्षात २,००,२८,१०८ समभागांसाठी मागणी नोंदवली गेली. रिटेल वैयक्तिक गुंतवणूकदारांनी १.३७ पट मागणी नोंदवली. या आयपीओमध्ये ७६० कोटी रुपयांचे नवे समभाग आणि २०० कोटी रुपयांचे समभाग ऑफर फॉर सेल अंतर्गत विक्रीला काढले गेले आहेत. यासाठी प्रतिसमभाग २७७ ते २९१ रुपये दरपट्टा ठरवण्यात आला आहे.

### तीन आयपीओ आज

हॅपी फोर्जिंग्ज लिमिटेड, आरबीझेड ज्वेलर्स लिमिटेड आणि क्रेडो ब्रँड्स मार्केटिंग लिमिटेड या तीन कंपन्या आज, मंगळवारी आयपीओद्वारे भांडवल बाजारात उतरतील. हॅपी फोर्जिंग्ज १,००८.५९ कोटी रुपयांची उभारणी करणार असून यासाठी प्रतिसमभाग ९५ ते १०० रुपये दरपट्टा ठेवण्यात आला आहे. आरबीझेड ज्वेलर्स १०० कोटी रुपयांची उभारणी करणार आहे, तर क्रेडो ब्रँड्स ५४९.७८ कोटींची उभारणी करणार आहे. तिन्ही कंपन्यांचे आयपीओ २१ डिसेंबरपर्यंत गुंतवणुकीसाठी खुले राहतील. याखेरीज आझाद इंजिनिअरिंग आणि इनोव्हा कॅपटॅब यांचे आयपीओ अनुक्रमे २० व २१ डिसेंबर रोजी बाजारात येतील.